# नागपूर महानगरपालिका, नागपूर

**(जनसंपर्क विभाग)**

**प्रसिद्धी पत्रक** **ता. ८ जानेवारी २०१९**

## तुम्हा-आम्हा सर्वांची मानसिकता बदलविण्यासाठी 'मम्मी पापा यू टू'

### महापौर संदीप जोशी : अभियान यशस्वी करण्याचे मुख्याध्यापकांना आवाहन

**नागपूर, ता. ७ :** कुणावर जबरदस्ती केल्याने शहर स्वच्छ होऊ शकत नाही. हा मानसिकतेचा भाग आहे. माझे शहर स्वच्छ ठेवण्यासाठी मी पुढाकार घेईन. माझ्या सवयी बदलेन. असे सर्वांनी ठरविले तर नागपूर शहर स्वच्छ होण्यास कुणीही अडथळा आणू शकणार नाही. मानसिकता बदलण्याचे हेच कार्य विद्यार्थ्यांच्या पुढाकारातून 'मम्मी पापा यू टू' अभियानाच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. हे अभियान यशस्वी करण्यासाठी प्रत्येक शाळांच्या मुख्याध्यापकांची भूमिका महत्त्वाची आहे. आपल्या शहरासाठी सर्वांनी या अभियानात 'बेस्ट' देण्याचे आवाहन नागपूर नगरीचे महापौर संदीप जोशी यांनी केले. नागपूर महानगरपालिका, शालेय शिक्षण विभाग आणि नागपूर वाहतूक पोलिसांच्या सहकार्याने विद्यार्थी केंद्रबिंदू ठेवून 'मम्मी पापा यू टू' हे अभियान हाती घेण्यात आले आहे. १३ ते १९ जानेवारी दरम्यान राबविण्यात येणाऱ्या या अभियानाच्या माध्यमातून घरातील मोठ्यांच्या स्वच्छता आणि वाहतूक नियमांबाबत असलेल्या वाईट सवयी बदलिवण्यासाठी विद्यार्थ्यांच्या माध्यमातून जनजागृती करण्यात येणार आहे. याच अभियानाच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक शाळांतील विद्यार्थ्यांनी यामध्ये १०० टक्के सहभाग द्यावा, विद्यार्थ्यांसाठी आयोजित स्पर्धांमधून मोठ्या प्रमाणावर जनजागृती व्हावी याकरिता १४०० शाळांतील मुख्याध्यापकांची कार्यशाळा बुधवारी (ता. ८) कविवर्य सुरेश भट सभागृहात आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.

मंचावर महापौर संदीप जोशी यांच्यासह उपमहापौर मनीषा कोठे, आयुक्त अभिजीत बांगर, शिक्षण समितीचे सभापती प्रा. दिलीप दिवे, उपसभापती प्रमोद तभाने, अतिरिक्त आयुक्त राम जोशी, शिक्षणाधिकारी प्रीती मिश्रीकोटकर, पर्यावरण क्षेत्रात कार्य करणाऱ्या जुही पांढरीपांडे, शिक्षण उपनिरीक्षक चव्हाण, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) श्री. वंजारी, उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) श्री. राठोड, उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक) श्री. झोडे उपस्थित होते.

महापौर संदीप जोशी पुढे म्हणाले, मी जलप्रदाय समितीचा सभापती असताना दाढी करताना नळ सुरू ठेवला. माझ्या मुलीने मला पाणी वाया जात असल्याबाबत टोकले. तेव्हा माझ्या लक्षात आले की आपण गावभर पाणी बचतीसंदर्भात सांगत असतो आणि आपणच ते वाया घालवतो. विद्यार्थी असलेल्या माझ्या मुलीला जर हे कळतं तर मला का नाही? हे एक उदाहरण आहे. अशी उदाहरणे घरोघरी आहे. विद्यार्थ्यांना आपल्यामुळे लाज वाटू नये, किमान आपल्या पुढल्या पिढीने आपल्या चांगल्या सवयीचे अनुकरण करायला हवे यासाठी आपल्यालाच आता बदलण्याची गरज आहे. यासाठी विद्यार्थी हा केंद्रबिंदू ठेवून प्रत्येक नागरिकांची मानसिकता बदलविण्यासाठी सुरू करण्यात आलेले 'मम्मी पापा यू टू' हे अभियान महत्त्वाची भूमिका निभावणार आहे. मुख्याध्यापकांच्या कार्यशाळेनंतर नागपूर शहरातील संपूर्ण शाळांमध्ये ११ जानेवारी रोजी एकाचवेळी पालक सभा आयोजित करण्यात येणार आहे. या पालक सभांच्या

माध्यमातून पालकांना या गोष्टींची जाणीव करून द्या, असे आवाहन महापौर संदीप जोशी यांनी मुख्याध्यापकांना केले. या अभियानाचा गाभा आपल्याला समजला तर अभियानाचा संदेश प्रभावीपणे नागपूरकरांपर्यंत पोहोचेल आणि म्हणूनच यात मुख्याध्यापकांची भूमिका महत्त्वाची असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

आयुक्त अभिजीत बांगर म्हणाले, महानगरपालिकेच्या इतिहासात स्वच्छतेसाठी लोकांनी सहभागी करून घेण्यासाठी राबविण्यात आलेले हे सर्वात मोठे अभियान आहे. नागपूर महानगरपालिकेची संपूर्ण यंत्रणा स्वच्छ भारत अभियानात क्रमांक एक वर येण्यासाठी प्रयत्नरत आहे. लोकसहभाग वाढला तर त्यात काहीही अडचण नाही. यासाठीच 'मम्मी पापा यू टू' हे अभियान महत्त्वाकांक्षी असल्याचे त्यांनी सांगितले.

शिक्षण समितीचे सभापती प्रा. दिलीप दिवे यांनी प्रास्ताविकातून संपूर्ण अभियानाची माहिती दिली. अभियानाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांसाठी आणि पालकांसाठीही विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धा हे निमित्त असले तरी त्यामाध्यमातून जनजागृती करणे, विद्यार्थ्यांच्या माध्यमातून स्वच्छता आणि वाहतूक नियमांबाबत पालकांची मानसिकता बदलविणे हाच उद्देश आहे. विद्यार्थ्यांना या स्पर्धांच्या माध्यमातून लाखोंची बक्षिसेही देण्यात येणार आहे. या अभियानांतर्गत मानवी साखळी करण्यात येणार असून देशातच नव्हे तर जगात तीन लाख विद्यार्थी एकाच वेळी मानवी साखळी तयार करण्याची ही पहिलीच वेळ असणार असल्याचा गौरवोल्लेख त्यांनी यावेळी केला.

अतिरिक्त आयुक्त राम जोशी यांनी स्वच्छ सर्वेक्षणाबाबत माहिती दिली. स्वच्छ सर्वेक्षणात नागपूर जेव्हापासून भाग घेतोय तेव्हापासून परिस्थिती आणि क्रमांक कसे बदलत गेले. यावर्षी नागपूरला काय अपेक्षा आहेत, याबाबत त्यांनी माहिती दिली.

शिक्षणाधिकारी प्रीती मिश्रीकोटकर यांनी अभियानादरम्यान आयोजित स्पर्धांचे स्वरूप काय राहील, नियमावली काय राहील, त्याचे आयोजन कशाप्रकारे राहील, याबाबत संपूर्ण माहिती उपस्थित मुख्याध्यापकांना दिली.

तत्पूर्वी महापौर संदीप जोशी, आयुक्त अभिजीत बांगर आणि अन्य मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यशाळेचा शुभारंभ करण्यात आला. जनआक्रोश संस्थेच्या वतीने रवींद्र कासखेडीकर, दिलीप मुकेवार, डॉ. पैठणकर यांनी वाहतूक नियमांबाबत सादरीकरणाच्या माध्यमातून माहिती दिली. वाहतुकीचे नियम मोडण्याचे काय गंभीर परिणाम असू शकतात, याबाबत सांगितले. 'वाहतुकीचे नियम पाळा आणि जीवन सुरक्षित ठेवा' असा संदेश त्यांनी दिला. जुही पांढरीपांडे यांनी प्लास्टिक उपयोगाचे दुष्परिणाम आणि यासाठी नागरिकांनी काय करायला हवे, याबाबत सादरीकरणाच्या माध्यमातून प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे संचालन मधु पराड यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सहायक शिक्षणाधिकारी कुसूम चाफलेकर, शिक्षण विभागाचे विनय बगले, क्रीडा निरीक्षक नरेश चौधरी यांच्यासह शिक्षण विभागाचे सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.